CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.१३ डिसेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ७४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## भजनलाल शर्मा राजस्थानचे नवे मुख्यमंत्री

**जयपूर** : छत्तीसगड, मध्य प्रदेश प्रमाणेच भाजपाने राजस्थानमध्ये नेतृत्व बदल केला असून भजनलाल शर्मा यांना नवे मुख्यमंत्री म्हणून निवडले आहे. राजस्थानमध्ये मुख्यमंत्रीपदाचा दावेदार ठरविण्यासाठी मॅरेथॉन बैठक सुरू होती. केंद्रीय निरीक्षक आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, विनोद तावडे आणि सरोज पांड्या यांनी राज्यातील महत्त्वाच्या नेत्यांशी चर्चा केली. दुपारी २ वाजता राजनाथ सिंह केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यासह जयपूर येथे आले. यावेळी माजी मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्रीपदाच्या दावेदार समजल्या जाणाऱ्या वसुंधरा राजे यांनी त्यांचे स्वागत केले. राजस्थानमधील भाजपा आमदारांची आज बैठक घेऊ आणि संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तुम्हाला नवा मुख्यमंत्री मिळेल, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सीपी जोशी यांनी दुपारी माध्यमांशी बोलताना म्हटले होते. त्याआधीच मुख्यमंत्रीपदाच्या नावाची घोषणा झाली.



५६ वर्षीय भजनलाल शर्मा हे पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आले आहेत. .त्यांनी पक्ष संघटनेत दीर्घकाळ काम केले असून ते चार टर्म भाजपाचे प्रदेश सरचिटणीस होते. भजनलाल शर्मा यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी आहे. तसेच त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतही काही काळ काम केलेले आहे.भाजपाच्या विधीमंडळ सदस्यांच्या बैठकीत माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनीच भजनलाल शर्मा यांच्या नावाच प्रस्ताव ठेवला आणि नंतर पक्षाच्या सर्व आमदारांनी त्याला पाठिंबा दिला.

# युवा संघर्ष यात्रेला हिंसक वळण; आक्रमक कार्यकर्त्यांवर लाठीचार्ज

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**उपराजधानी नागपूरमध्ये आ.रोहित पवार यांच्या युवा संघर्ष यात्रेच्या समारोपाला मंगळवारी हिंसक वळण लागले. कार्यकर्त्यांनी पोलिसांचे कडे तोडून विधान भवनात घुसण्याचा आततायीपणा केले. तेव्हा पोलिसांनी बळाचा वापर केला.समजावून सांगूनही कार्यकर्ते ऐकण्याचा मनस्थितीत नव्हते तेव्हा पोलिसांनी आक्रमक कार्यकर्त्यांना लाठीचा प्रसाद दिला.लाठीचार्ज झाल्यानंतर मोठा गोंधळ उडाला. पोलिसांनी पवारांना ताब्यात घेवून सुरक्षितस्थळी हलवले तसेच कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यानंतर वातावरण निवळले. लाठीचार्जमुळे महायुतीचे सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या राज्यभर संघर्ष माजण्याची चिन्हे आहेत.**

राज्यभरातील युवकांना सोबत घेऊन आ. पवार यांनी काढलेल्या युवा संघर्ष यात्रेला समारोपानंतर नागपुरात हिंसक वळण लागले. विधानभवनाकडे जाणाऱ्या संघर्ष यात्रेला पोलिसांनी अडवले. ही घटना सायंकाळी सहा वाजता घडली. तब्बल अर्धा तासाच्या गोंधळानंतर पोलिसांनी पवार आणि रोहित पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांन ताब्यात घेतले. यावेळी सरकारविरोधी घोषणाबाजी करण्यात आली.

रोहित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यानंतर सह पोलीस आयुक्त अश्वती दोर्जे यांनी प्रतिक्रिया दिली की, रोहित पवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना यात्रेचा शांततेत समारोप करा असे सांगितले होते. मात्र, विधान भवनाकडे जाताना ते आक्रमक दिसून आल्याने त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई केली. एकजण जखमी झाला आहे त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असून, आमदार रोहित पवार आणि इतर कार्यकर्त्यांना नजर कैदेत ठेवण्यात आले आले आहे तर सीसीटीव्ही फुटेज पाहून कारवाई केली जाणार असल्याची माहिती सह पोलीस आयुक्त अश्वती दोर्जे यांनी दिली.

### आ.पवार नजरकैदेत



**रोहित पवार पोलिसांच्या ताब्यात**

या सर्व राडेबाजीनंतर पोलिसांनी रोहित पवार यांना ताब्यात घेतले. पवारांना ताब्यात घेतल्यानंतर राष्ट्रवादी आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. पवार यांनी पोलिसांच्या गाडीजवळ ठिय्या मांडला. पवार आणि कार्यकर्त्यांनी पोलिस व्हॅनबाहेर ठिय्या मांडल्यानंतर, पोलिसांनीही बळाचा वापर करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी जबरदस्तीने कार्यकर्त्यांना गाडीत बसवले. यानंतर पोलिसांनी रोहित पवार यांनाही ताब्यात घेऊन गाडीत बसवण्याचा प्रयत्न केला. मात्र कार्यकर्त्यांनी त्यांच्या भोवतीकडे करुन रोहित पवार यांना ताब्यात घेण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला.



**राडा का झाला?**

निवेदन देण्यावरून मात्र जोरदार राडा झाला. पवार हे शेतकरी आणि युवकांच्या प्रश्नावर सरकारला निवेदन देणार होते, मात्र त्यांचे निवेदन स्वीकारण्यासाठी भाजपचे शहराध्यक्ष आले आणि पवार चांगलेच भडकले. हे सरकार एका आमदाराचे ऐकत नसेल तर सर्वसामान्यांचे काय ऐकणार असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. सरकारने जर जबाबदार व्यक्तीला निवेदन स्वीकारण्यासाठी पाठवावे अन्यथा आपण विधानभवनवर धडकणार असा इशारा रोहित पवारांनी दिला होता. त्यांच्या इशाऱ्यानंतरही पवारांचे निवेदन स्वीकारण्यासाठी सरकारच्या वतीने भाजपचे शहराध्यक्ष त्या ठिकाणी आले आणि पवारांचा पारा चढला.



**धरपकड-लाठीचार्ज**

कार्यकर्ते हे विधानभवनच्या दिशेने निघाले. त्यावेळी कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांनी तीन बॅरिकेट्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी रोहित पवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना अडवले. पोलिसांनी यावेळी लाठीचार्ज केला त्यामुळे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाल्याचं दिसून आलं. त्यानंतर पोलीस रोहित पवारांना ताब्यात घेण्यासाठी आले. त्यावेळी कार्यकर्त्यांनी रोहित पवारांच्या बाजूने कडे केलं आणि ठिय्या मांडला.

## लकी हॉस्पिटलची तोडफोड; कुर्डूवाडी पोलिसात गुन्हा दाखल

सुराज्य/कुर्डुवाडी

आमचा पेशंट का ॲडमिट करुन घेतला नाही, म्हणून डॉक्टरांना शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देऊन दगडाने लकी हॉस्पीटलच्या प्रवेशद्वारावरील काच फोडून हॉस्पिटलचे नुकसान केले. ही घटना सोमवार, दि. ११ रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात डॉ.लकी राजकुमार दोशी यांनी फिर्याद दिली आहे.

टेंभुर्णी रोड कुर्डूवाडी येथे डॉ. लकी दोशी यांचे 'लकी हॉस्पिटल' आहे. सोमवार, दि.११ रोजी डॉ. लकी घरी असताना हॉस्पिटलमधील स्टाफ अभिजित खंडागळे यांनी डॉक्टरांना मंगल खवळे हे पेशंट हॉस्पिटमध्ये उपचारासाठी आणले आहे. त्यांचा बीपी हा ५०-३० इतका असून, शुगरची औषधे चालू आहेत. त्यांच्या छातीतही दुखत होते. त्यावेळी डॉक्टरांनी आयसीयुमध्ये जागा शिल्लक आहे का बघ, असे खंडागळेंना सांगितले. त्यावर खंडागळे यांनी जागा शिल्लक नसल्याचे डॉक्टरांना सांगितले. त्यावर डॉक्टरांनी सदर पेशंटला तत्काळ उपचाराची गरज आहे, तरी दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जावा, असे सांगण्यास सांगितले. त्यानंतर रात्री ९ वाजता डॉक्टर लकी हॉस्पिटलमधील ओपीडी पेशंट तपासणी करीत असताना एक गंभीर रुग्ण आल्याने डॉक्टर ओपीडी बाहेर आले. त्यावेळी चार तरूण हॉस्पीटलमध्ये पळत आले. त्यापैकी डॉक्टरांच्या ओळखीचा सनी खवळे डॉक्टरांना म्हणाला की, आज सकाळी आमचा पेशंट का घेतला नाही. तुमच्यामुळे त्यांना लवकर उपचार मिळाले नाहीत.तो मयत झाला आहे. म्हणून शिवीगाळ करीत डॉक्टरांच्या अंगावर गेला. त्याच्या पाठीमागच्या तरूणाने स्टूल उचलून डॉक्टरांच्या अंगावर गेला. त्यावेळी तिथे असलेल्या वसीम शेख व अभिजित खंडागळे यांनी त्यास थांबविले. दुसऱ्या एका इसमाने कॉम्प्युटर उचलून मदतनीस सुनील घुगे याच्या डोक्यात मारला. पेशंटच्या नातेवाईकांनी त्यांना समजावून बाहेर पाठवले. एकाने हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारावरील काचेवर दगड मारून काच फोडून नुकसान केले.

## कोर्टीत दरोडा टाकून पलायन; दरोडेखोर विहिरीत पडल्याने सापडला

सुराज्य/करमाळा

शेतातील वस्तीवर सशस्त्र दरोडा टाकून पळून जाताना एक दरोडेखोर कोरड्या विहिरीत कोसळून जखमी झाला. त्याला ग्रामस्थांनी पकडून करमाळा पोलिसांच्या स्वाधीन केले. ही घटना कोर्टी (करमाळा) येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली.

नितीन ऊर्फ नीतू वैश्या भोसले (वय-३३, भेंडाळा, गंगापूर) असे पोलिसांच्या तावडीत सापडलेल्या दरोडेखोराचे नाव आहे. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्याचे अन्य पाच साथीदार फरार असून, त्यांचा शोध पोलीस घेत आहेत.

कोर्टी (करमाळा) येथील ठकार वस्तीवर अनिल साहेबराव शिंदे हे शेतकरी राहण्यास आहेत.रात्रीच्या सुमारासस घरातील सर्व लोक जेवण करून झोपले होते. सोमवारी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास कुत्री भुंकण्याच्या आवाजाने त्यांना जाग आली. खिडकीतून बॅटरीचा प्रकाश दिसून आला. त्यावेळी अनिल यांनी दरवाजा उघडून बाहेर आले. तेव्हा अंधारात लपलेल्या दरोडेखोरांनी अचानक तीक्ष्ण शस्त्र आणि कुऱ्हाडीच्या दांडक्याने पायावर मारहाण करीत त्यांचा मोबाईल काढून घेतला. त्यांच्या आवाजाने कुमार (भाऊ) हे मदतीसाठी बाहेर आले. त्यांच्यावर दरोडेखोरांनी दगडफेक करून जखमी केले. शिंदे बंधूच्या आवाजाने वस्तीवरील लोक जागे होऊन त्यांचा घराकडे धाऊन आले आणि दरोडेखोरांचा पाठलाग केला. अंधाराच्या दिशेतून पळून जाताना एक दरोडेखोर कोरड्या विहिरीत कोसळला. ग्रामस्थांच्या तावडीत सापडला. अन्य पाच दरोडेखोर पळून जाण्यात यशस्वी ठरले. हाती लागलेल्या नितीन भोसले याला ग्रामस्थकरमाळा पोलिसांच्या स्वाधीन केले. तपास सहाय्यक निरीक्षक बंडगर करीत आहेत.

## चुलत्याची हत्या करून मुंडके पळवले; पुतण्याला ७ दिवसांची कोठडी

**● मुंडके केले धडावेगळे**
**● घटनेने परिसर हादरला**

सुराज्य/अकलूज

जमिनीच्या वादातून धडावेगळे केलेले मुंडके शेवरे (माढा) येथे जमिनीच्या वादातून वृद्ध चुलत्याचा खून करून त्याचे मुंडके घेऊन पसार झालेल्या आरोपींपैकी एकाला पोलिसांनी अटक केली. त्याला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी ठेवण्याचा आदेश मंगळवार, दि. १२ डिसेंबर रोजी दिला आहे.

दरम्यान, धडावेगळे झालेले मुंडके घरापासून पंधरा किलोमीटर अंतरावरील एका शेतात पोलिसांना आढळले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आकाश बाबासाहेब जाधव (वय-३०) असे असून, त्याला न्यायालयाने दि. १८ डिसेंबरपर्यंतची पोलीस कोठडी दिली आहे. ही घटना सोमवारी सकाळी १०.३० ते १०.४५ वाजण्याचा सुमारास घडली. आरोपी मयताचे मुंडके सोबत घेऊन गेल्याने रात्री उशीरा पर्यंत अंत्यसंस्कार करण्यात आले नव्हते. मंगळवारी माळीनगर (माळशिरस) येथे मयत व्यक्तीचे मुंडके सापडल्यानंतर मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. शंकर प्रल्हाद जाधव (वय-६५) असे मयत वृद्धाचे नाव आहे.



मयत शंकर प्रल्हाद जाधव व त्यांच्या सावत्र भावांची चार मुले शिवाजी बाबासाहेब जाधव, परमेश्वर जाधव, आकाश जाधव, अजित जाधव यांचा कुरण वस्ती (शेवरे, माढा) वडोली हद्दीतील जमिनीबाबत वाद होता. मयत शंकर जाधव यांचा मुलगा अमोल जाधव व इतर घरातील सर्व वडोली येथील शेतात काम करण्यासाठी गेले होते. काही दिवसापुर्वी मयत शंकर जाधव यांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया झाल्याने ते घरात एकटे झोपून होते. सकाळी १०.३० वाजण्याचा सुमारास आरोपी शिवाजी जाधव याच्यासह चौघांनी त्यांच्या घरात प्रवेश केला.त्यानंतर तिघांनी त्यांना पकडले तर शिवाजी जाधवने त्यांच्या गळ्यावर वार करून मुंडके धडा वेगळे केले. आणि त्यांचे मुंडके घेऊन शिवाजी जाधव हा दुचाकीवरून पसार झाला. अशी फिर्याद मयताचे नातू नरहरी नवनाथ बंडलकर यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात दिली आहे.

> घटनास्थापासून मयताचे धडा वेगळे केले मुंडके १५ किलोमीटरपर्यंत घेऊन आरोपीने मोटारसायकलवरून संगम ते अकलूज असा प्रवास केला. पोलिसांच्या भीतीने त्याने अकलूज परिसरातील एका शेतात मुंडके फेकून देऊन पसार झाला. पोलिसांनी मुंडके जप्त केले.

## पोलिसांच्या मारहाणीत जखमी; रुग्णालयात उपचारासाठी दाखल

**सोलापूर** : तक्रारसाठी पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलिसांनी केलेल्या मारहाणीत ५० वर्षीय इसम जखमी झाला. ही घटना मोहोळ पोलीस ठाण्यात सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. अण्णासाहेब दत्तू शिंदे (वय-५०, बिटले, मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमी शिंदे यांची पत्नी सोबत तक्रार झाली होती. त्यासाठी ते सोमवारी सायंकाळी मोहोळ पोलीस ठाण्यात गेले होते. तेव्हा तेथील पोलिसाने त्यांना बेदम मारहाण केली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## मिरजगी येथे विष प्राशन

**सोलापूर** : मिरजगी (अक्कलकोट) येथे राहणाऱ्या धर्मण्णा लक्ष्मण पाटोळे (वय -२५) या तरुणांनी विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सोमवारी दुपारच्या सुमारास त्याने शेतात हा प्रकार केला होता. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून मंगलदास (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली. या मागचे कारण समजले नाही.



## उमानगरी येथे चाकूने मारहाण

**सोलापूर** : पोलिसात आमच्याविरुद्ध तक्रार का दिली? या कारणावरून चाकू आणि लोखंडी गजाने मारहाण केल्याची घटना उमानगरी येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. देविदास भाऊ राऊत (वय-४५, मोहोळ सध्या रा. उमानगरी) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी गीता (पत्नी) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. त्यांना आकाश विष्णू बोदरे, कल्लप्पा शंकर पुजारी आणि अन्य चौघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कधीकाळी येथे प्रशस्त रस्ता होता!

कल्याण
257-46-600

मुंबई
334-09-900

## तुळजाभवानीचे दागिने लाटणारे उघड

**▸▸ महंत, सेवेदारी, अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश**
**▸▸ महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे प्राचीन मौल्यवान दागिने लाटणारे उघड झाले आहेत.**

सुराज्य/धाराशिव

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे प्राचीन मौल्यवान दागिने लाटणारे उघड झाले आहेत. जिल्हाधिकारी तथा मंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन ओम्बासे यांनी याप्रकरणी दोषी असलेले महंत, सेवेदारी आणि मंदिर संस्थानमधील अधिकारी व कर्मचार्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे यातील काही आरोपी मयत आहेत.

तुळजाभवानी देवीच्या खजिन्यात अनेक मौल्यवान दागदागिने आणि अलंकार आहेत. विविध राजे-महाराजे, संस्थानिक, मुघल बादशाह, निजाम, पोर्तुगीज, डच आदींनी देवीला मोठ्या भक्तिभावाने अर्पण केलेल्या प्राचीन अलंकारांची संख्याही मोठी आहे. भाविकांनी मागील १४ वर्षांत श्रद्धेपोटी देवीचरणी अर्पण केलेले वाहिक सोने २०७ किलो तर अडीच हजार किलो चांदी आहे. शिवकालीन दागिने, वेगवेगळ्या राज दरबारातील नाणी असा समृद्ध खजिना तुळजाभवानी देवीच्या मंदिरात होता. त्यावरच मंदिरातील महंत, मंदिर समितीचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच काही सेवादारींनी डल्ला मारला असल्याचे जिल्हाधिकार्यांकडे सादर करण्यात आलेल्या अहवालातून समोर आले आहे.



जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंदिरातील सोने-चांदीचे दागिने व अलंकाराची तपासणी करण्यासाठी उमरगा येथील उपविभागीय अधिकारी गणेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली १६ जणांची समिती गठीत केली होती. या समितीने जुलै महिन्यात आपला सविस्तर अहवाल सादर केला आहे. त्यानुसार महंतांच्या ताब्यातील दागदागिने, सेवेदारी, अधिकारी आणि कर्मचार्यांच्या अधिकार कक्षेत असलेले मौल्यवान प्राचीन अलंकार याची इनकॅमेरा तपासणी केली. त्यात अनेक प्राचीन, दुर्मिळ आणि मौल्यवान अलंकार गहाळ असल्याचे समोर आले आहे. तर काही अलंकार नव्याने त्या ठिकाणी ठेवून शेकडो वर्षे जुना असलेला दागिना गायब करण्यात आला आहे. अहवालानुसार जबाबदारी निश्चित करून संबंधित दोषींविरोधात कडक कायदेशीर कारवाई करण्यासाठी गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांनी तुळजापूर पोलिसांना दिले आहेत. दोनवेळा झालेल्या तपासणीत आढळून न आलेला ८२६ ग्रॅम वजनाचा सोन्याचा मुकूट कोषागारातील पितळी पेटीत सापडला असल्याचा अहवाल घाईगडबडीत ११ डिसेंबर रोजी जिल्हाधिकार्यांना सादर करण्यात आला आहे.